<u>नि. फौ. ख. क्र.१९०/२०१९</u> निशाणी क्र.३२

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – दिनेश किसनराव दाते

वय – ४५ वर्षे, व्यवसाय – सुरक्षा रक्षक

पत्ता – रा. हरीहर पेठ, अकोला, ता. जि. अकोला

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि.१६.०७.२०१७ रोजी मी पारस औष्णीक ऊर्जा केंद्र येथील कॉलनीमध्ये सुरक्षारक्षक म्हणून पेट्रोलिंग करीता कार्यरत होतो. संध्या. ८.३० वा. सुमारास मला आमचे पाळी अधिकारी श्री. शरद पांडे यांचा फोन आला व त्यांनी मला सांगितले की, पारस डॅम येथे जायचे आहे त्या ठिकाणी चोरी झालेली आहे, त्याचा पंचनामा करावयाचा आहे. मी त्या ठिकाणी गेलो तेथे श्री. खवले, सुरक्षारक्षक, शरद पांडे हजर होते. मी त्या ठिकाणी गेलो त्या वेळी तो तयार केलेला होता. तो मला वाचण्यास दिला व त्यावर मी सही केली. त्यातील मजकूर काय लिहीलेला आहे, हे मला माहित नाही. आता मला सदर घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर अ.क्र.१ वर माझी सही असून त्यातील मजकूर काय लिहीलेला आहे हे मला माहित नाही. सहीस अनुकमे **नि.क्र.३३ व ३४** देण्यात येत आहे.

(<u>साक्षीदार अभियोग पक्षास पुरक साक्ष देत नसल्याकारणाने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.</u>)

२. दि.१६.०७.२०१९ रोजी मला पोलीसांनी पारस डॅम येथे घटनास्थळ पंचनामा करणेकामी बोलावून पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला, असे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर वाचून समजून त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनामामध्ये तेथे असलेल्या सद्यपरिस्थीतीचे वर्णन नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३५** देण्यात येत आहे.

३. तसेच लगुन क्र.२ या ठिकाणी कापलेल्या लोखंडी पाईपाचे तुकडे व लोखंडी करवत व एक मोटारसायकल होती. पोलीसांनी सदरचा मुद्देमाल हा माझ्यासमक्ष जप्त केला. तो पंचनामा माझ्यासमक्ष तयार करुन त्यावर मी वाचून समजून सही केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यास **नि.क्र.३६** देण्यात येत आहे. सदर तीन लोखंडी पाईप व लोखंडी करवत दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला आर्टीकल १ ते ४ कडील मुद्देमाल दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र.१ वर माझी कागदी लेबलवर सही आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती व्ही. एच. शेगोकार यांचे मार्फत उलटतपासः</u>**

४. मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्याकरीता पोलीसांनी लेखी समन्स दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदर डॅमच्या आजूबाजूला शेतशिवार आहे. सदर शेतशिवारामध्ये पाईप लाईन गेलेली आहे अथवा नाही, हे मला माहित नाही. घटनास्थळावरुन मिळून आलेल्या लोखंडी पाईप ह्या आजूबाजूच्या शेताच्या शेतकऱ्यांच्या होत्या अथवा नाही, हे मला माहित नाही. आर्टीकल १ कडील करवत ही सहज बाजारात मिळू शकते. घटनास्थळावरील आवारात सकाळच्या वेळेत मजूर कामासाठी हजर असतात परंतु रात्रीच्यावेळी ते हजर नसतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजूबाजूला सुरक्षा कर्मचारी देखील तैनात असतात.

५. त्या दिवशी पारस कॉलनी येथे माझी ड्युटी होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर पंचनामा तयार केल्यावर केवळ मी त्यावर सही त्यामधील मजकूर काय नमुद केला आहे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणताही घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्याकरीता गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज न्यायालयात खोटा पुरावा देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०८.०९.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.09.08 17:26:37 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | ०८/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०८/०९/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०८/०९/२०२५ |